| | |
|---|---|
| MHLA160007862025 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४९/२०२५</u>**<br>**<u>तानाजी वि. निरंक</u>** |

## <u>नि.१ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी हा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात असे की, अर्जदार क्र.१ व २ यांचा मुलगा नामे नरहरी तानाजी भंडारे यांचा दिनांक १०/०१/२०२५ रोजी मृत्यू झाला. त्यांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांस शासकीय निमशासकीय अभिलेखामध्ये वारसांची नोंद घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यांनी त्याप्रमाणे मागणी केली.

३. प्रस्तुत प्रकरणामध्ये न्यायालयीन नोटीस/जाहीरनामा आणि वर्तमानपत्रामध्ये नोटीस प्रकाशित केली. परंतु कोणीही अर्जदारांच्या कथनावर हरकत वजा आक्षेप घेतलेला नाही.

४. मी उपलब्ध अभिलेख आणि युक्तिवाद यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता, माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आणि मी त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह देत आहे.

| | **मुद्दा** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे मयत नरहरी तानाजी भंडारे यांची वारस आहेत व त्यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, | | होय. |

| | | | |
|---|---|---|---|
| | हे सिध्द झाले काय? | | |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. | |

**कारणमीमांसा**

**<u>मुद्दा क्र.१ व २</u> –**

५. दोन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधित असून त्यांना मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याकरता एकदाच चर्चेकरता घेतले आहे.

६. तानाजी तुकाराम भंडारे (अ.सा.क्र.१) यांनी अर्जातील कथनाची साक्षमध्ये पुनरावृत्ती केली. अर्जदाराचे अधिवक्ता श्री. डी.एन. कांबळे यांनी अर्जाप्रमाणे युक्तिवाद समजण्यास सांगितले.

७. तसेच, प्रस्तुत अर्जामध्ये न्यायालयीन जाहीर नोटीस (नि.१०) आणि वर्तमानपत्रातील जाहीर नोटीस (नि.१५) प्रकाशित केल्यानंतर सुध्दा कोणीही या अर्जावर हरकत किंवा आक्षेप घेतलेला नाही. यथास्थितीत, अर्जदाराच्या साक्षीवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण नाही. त्यांची साक्ष सबळ व प्रत्यक्ष आहे. त्याप्रमाणे, नरहरी तानाजी भंडारे यांचा मृत्यू झाल्याचे सिध्द झाले. त्याकरिता, निबंधक ग्रामपंचायत वलांडी यांनी दिलेला मृत्यूचा दाखला (नि.१४) दुजोरा देतो. सबब, मयत नरहरी तानाजी भंडारे यांना अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे आणि वारस प्रमाणपत्राची आवश्यकता सबळरित्या सिध्द झाली. अर्जातील कारण समाधानकारक आहे.

८. उपरोक्त चर्चेप्रमाणे, अर्जदार हे मयत नरहरी तानाजी भंडारे यांचे वारस आहेत. बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाचे कलम २ प्रमाणे मयताच्या वारसांना मान्यता देता येते. अर्जदारांनी सदर तरतुदींचे घटक पूर्णतः सिध्द केलेले आहेत. यथास्थितीत मुद्दा क्र.१ ला होकारार्थी उत्तर दिले व मुद्दा क्र.२ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत नरहरी तानाजी भंडारे यांचे वारस आहेत आणि त्यांना विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राकरिता नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क द्यावे व त्यानंतर वारसा प्रमाणपत्र (heirship certificate) जारी करावे.

४. आदेश संगणकावर टंकलिखित करून खुल्या न्यायालयामध्ये घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.04.13 16:11:13 +0530

दिनांक – १३/०४/२०२६. (श.अ. सुरजुसे)
देवणी. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, देवणी.